**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ०४/२०१८-१९/११३ दिनांकः २५.०५.२०१८

**आदेश**

**आदेश केस क्र. ०४/२०१८-२०१९**

श्री लक्ष्मण एकनाथ गणपते
गट क्र. ५०९/३ रांगोळी ता. हातकणंगले
१४/३१ हुलगेश्वरी रोड इचलकरंजी जि. कोल्हापूर **अर्जदार**

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर **पक्षकार**

२) कार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
ग्रामिण विभाग-२ कोल्हापूर

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग हुपरी

**कोरमः**-१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. पी.व्ही.. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

**न्यायनिर्णय**

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

24/5/2018

तक्रारदार श्री लक्ष्मण एकनाथ गणपते, गट क्र. ५०९/३ रागोळी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर पत्ता १४/३१ हुलगेश्वरी रोड इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर यांनी सदर गा-हाणे अपिल, त्यांना शेती पंप वीज जोडणी त्वरीत मिळणेसाठी दिनांक २७.०४.२०१८ रोजी दाखल केले आहे.

**गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.**

१. तक्रारदार यांचे म्हणणे असे की, त्यांनी शेतीसाठी नविन वीज जोडणी मिळणेसाठी रितसर अर्ज वि.प. यांचेकडे सादर करुन नंतर आवश्यक ती रक्कम भरणा केली. परंतु त्यांना वीज जोडणी मिळाली नाही म्हणून त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. सदर कक्षाने दिनाक ०४.०४.२०१८ च्या आदेशाने ग्राहकाची त्वरीत विज जोडणीची मागणी फेटाळण्यात येत आहे. असा निर्णय दिला. त्याने समाधान झाले नसल्यामुळे या मंचाकडे प्रस्तुत अपिल दाखल केले आहे.

**वि. प. यांची भूमिका.**

१. तक्रारदार यांनी वरील प्रमाणे दि. ११.०४.२०१७ रोजी रक्कम रु. २६४५/-भरणा केली हे वि.प. यांना मान्य आहे. तक्रारदाराचे नाव हुपरी उपविभागीय कार्यालयाच्या प्रतिक्षा यादीत नोंद केले आहे.नियमानुसार त्यांना वीज जोडणी देणेत येत आहे.

२. उपविभाग हुपरी अतंर्गत असणारी शेतीसाठी वीज पुरवठा देणे आवश्यक असणारी विद्युत संच उभारणीची कामे ही प्रतिक्षा यादी मधील सदर ग्राहकाचे नाव प्रतिक्षा यादीमध्ये ६११ व्या क्रमांकास आहे.

३. या प्रकरणाची सुनावणी दिनांक २५.०५.२०१८ रोजी मंचासमोर घेणेत आली. त्यावेळी तक्रारदार यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री मुकुंद महादेव माळी हे उपस्थित होते. वि.प. विज वितरण कंपनी तर्फे . कोणीही प्रतिनिधी हजर नव्हते.

४. या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत.

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणीनुसार शेतीसाठी नवीन वीज जोडणी निश्चित कालावधीत देण्याचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- होय.

२) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

२. तक्रारदारांनी वि.प.कडे रक्कम भरल्यानंतर त्यांना नियमानुसार तीन महिन्यात वीज जोडणी मिळालेली नाही. तक्रारदार यांना वीज पुरवठा करण्यासाठी वर परिच्छेद-३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुदाब वाहिनीचा विस्तार करावा लागणार आहेत. नविन उपकेंद्र उभारणेची गरज नाही. तक्रारदार यांची नावे प्रतिक्षायादीत विशिष्ट क्रमांकास नोंद आहेत. सबबत फारसा विचार करता येणार नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

३. विशिष्ट मुदतीत वीज पुरवठा देणे कायद्याने वि.प. यांचेवर बंधनकारक आहे. तसे न केल्यास विद्युत कायदा २००३ च्या कलम ४३(३) मध्ये दंडात्मक तरतूद केली आहे. कृतीमानके विनियमाप्रमाणे वीज जोडणी देण्यात विलंब झाल्यास भरपाई देण्याची तरतूदही विद्युत नियामक आयोगाने केली आहे. त्यामुळे "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" तत्वाचा उपयोग वि.प. यांना करता येत नाही. तक्रारदाराकडून भरपाईची मागणी करण्यात आलेली नाही.

## आदेश

१) तक्रारदार यांना त्यांच्या मागणी प्रमाणे शेतीसाठी नविन वीज जोडणी वि.प. यांनी दि. २७.०६.२०१८ पर्यन्त देऊन वीज पुरवठा चालू करावा असा वि.प. यांना आदेश देणेत येत आहे.

२) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

24/5/2018 | 24/5/2018 | 24/5/2018

( पी.एस. पुजारी)
ग्राहक सदस्य

(पी. व्ही. खपली)
सदस्य सचिव

(ए.व्ही. देशपांडे)
अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण